महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १३० वा | दिनांक : १५/०२/२०२५ | वार : शनिवार

## सुरेश धसांकडून दगाफटका होईल असे वाटले नव्हते - मनोज जरांगे



**जालना** : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी भाजप आमदार सुरेश धस व मंत्री धनंजय मुंडे यांच्या भेटीवर संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. सुरेश धस व धनंजय मुंडे यांची भेट अत्यंत धक्कादायक आहे. आम्ही धसांवर खूप मोठा विश्वास दाखवला. पण त्यांनी राजकारण व सत्तेच्या आहारी जाऊन समाजाशी दगाफटका केला. आम्हाला त्यांच्याकडून अशी अपेक्षा नव्हती, असे जरांगे यांनी म्हटले आहे.

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे हे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे अडचणीत सापडले होते. भाजप आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणी त्यांच्यावर 'आकाचा आका' म्हणत टीकेची झोड उठवली होती. तसेच त्यांचा राजीनामाही मागितला होता. पण आता त्यांनीच धनंजय मुंडे यांची भेट घेऊन या प्रकरणी एकप्रकारे आपले शस्त्र टाकले आहेत. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे यांनी त्यांच्यावर शरसंधान साधले आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, मंत्री धनंजय मुंडे व भाजप आमदार सुरेश धस यांच्या भेटीची गोष्ट माझ्या कानावर आली आहे. याविषयी माझ्याकडे जास्त माहिती नाही. त्यामुळे मला त्यावर फार काही बोलता येणार नाही. पण ही भेट झाली असेल तर फार धक्कादायक आहे. गोरगरिबांच्या लेकरांच्या न्यायासाठी आपण लढलात म्हणून या कोट्यवधी समाज बांधवांनी तुमच्यावर खूप मोठा विश्वास दाखवला होता. हा विश्वास अजूनही आहे, पण राजकारणाच्या व सत्तेच्या एवढे आहारी जाऊन समाजाशी असा दगाफटका करणे योग्य नाही. सुरेश धस यांच्याकडून असे काही होईल याची आम्हाला कदापीही अपेक्षा नव्हती.

मनोज जरांगे म्हणाले, पत्रकारांनी एकदा सुरेश धस यांना एक प्रश्न केला होता की, पंकजा मुंडे मंत्री झाल्यानंतर तुम्ही त्यांना शुभेच्छा देणार का? त्यावर त्यांनी अजिबात देणार नसल्याचा दावा केला होता. जे मला पाडायला उठले होते त्यांना मी शुभेच्छा देणार नाही असे ते म्हणाले होते. आता या माणसाने (धनंजय मुंडे) तर आपल्या समाजबांधवाचा खून केला आहे. क्रूरपणे हत्या केली. त्याला भेटण्यासाठी हे कसे गेले? हे शॉकिंग आहे. मला यावर विश्वास बसत नाही.

उल्लेखनीय बाब म्हणजे भाजप प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी धनंजय मुंडे व सुरेश धस यांची एका खासगी रुग्णालयात भेट घडवून आणल्याचा दावा केला जात आहे. महत्त्वाचे म्हणजे बावनकुळे यांनीही ही भेट झाल्याचे मान्य केले आहे. पण मुंडे यांच्या कार्यालयाने याविषयी कानावर हात ठेवलेत. बावनकुळे याविषयी बोलताना म्हणाले की, आम्ही जवळपास ४ तास एकत्र होतो. सुरेश धस व धनंजय मुंडे हे दोघेही होते. त्यांच्यात मतभेद आहेत, पण मनभेद नाहीत. ते दूर होतील. आयुष्यात एक काळ असतो, जो मतभेद दूर करतो. मी पक्षाचा अध्यक्ष आहे. दोघेही मला भेटले. या दोघांत कौटुंबिक भेट झाली. कुटुंब म्हणून आम्ही एकत्र बसलो होतो.

## लोकांनी धुतलेली पापं अंगाला चिकटतील म्हणून मी महाकुंभमेळ्यात स्नान केले नाही - संजय राऊत



**मुंबई** : लोकांनी धुतलेली पापं अंगाला चिकटतील म्हणून मी महाकुंभमेळ्यात गंगा नदीत स्नान केले नाही, असे अजब विधान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील राऊत यांनी केले आहे. सुनील हे खासदार संजय राऊत यांचे बंधू असून, त्यांचे हे विधान राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहे.

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे महाकुंभमेळा सुरू आहे. या कुंभमेळ्यात संत, महंत, गरीब, श्रीमंत आदी सर्वचजण पवित्र स्नान करत आहेत. पण आता ठाकरे गटाचे आमदार सुनील राऊत यांनी या स्नानाविषयी एक विचित्र विधान केले आहे. विक्रोळीतील कन्नमवारनगर येथे आयोजित एका कार्यक्रमात उपस्थितांशी संवाद साधताना ते म्हणाले की, मी महाकुंभमेळ्यात सहभागी होण्यासाठी प्रयागराजला गेलो होतो. आज सकाळीच मुंबईत परतलो. मुंबईत आल्यावर लोकांनी मला नमस्कार केला. पाया पडले.

मी दोन दिवस प्रयागराजमध्ये मजा घेत होतो. कुणी किती पापं धुतली हे पाहत होतो. लोकांना ही पापं धुताना पाहिल्यावर ती पापं माझ्या अंगाला चिकटतील काय असे मला वाटले. त्यामुळे मी तिथे स्नान केले नाही. मी तसाच घरी परतलो, असे सुनील राऊत म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे प्रयागराज येथील महाकुंभमेळा आता आपल्या शेवटच्या टप्प्यात पोहोचला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या कुंभमेळ्यात उपस्थिती लावत त्रिवेणी संगमामध्ये पवित्र स्नान केले आहे. पण सुनील राऊत यांनी यांच्या उपरोक्त विधानाचे राजकीय वर्तुळात संमिश्र पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

दरम्यान, प्रयागराज हे भारतातील सर्वात महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे. येथील महाकुंभमेळा गत १३ जानेवारी रोजी सुरू झाला. तो येत्या २६ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. १४४ वर्षांनंतर होणाऱ्या दुर्मीळ ग्रहस्थितीमुळे या कुंभमेळ्याला आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ फेब्रुवारी २०२५

# आप नेते सत्येंद्र जैन यांना अटक होण्याची शक्यता




**नवी दिल्ली :** केंद्रीय गृह मंत्रालयाने मनी लॉड्रिंग प्रकरणात आप नेते सत्येंद्र जैन यांच्यावर खटला चालवण्यासाठी राष्ट्रपतींकडे परवानगी मागितली आहे. दिल्लीचे माजी आरोग्यमंत्री जैन यांच्याविरुद्ध बीएनएसच्या कलम २१८ अंतर्गत मंजुरीची मागणी करण्यात आली आहे.

ईडी आणि गृह मंत्रालयाचे हे पाऊल सत्येंद्र जैन यांच्याविरुद्ध सुरू असलेल्या कायदेशीर कारवाईचा एक महत्त्वाचा भाग मानले जात आहे. राष्ट्रपतींकडून मंजुरी मिळाल्यास, त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली जाईल आणि जैन यांना अटक देखील केली जाऊ शकते.

अंमलबजावणी संचालनालय (ईडी) ने केलेल्या तपासाच्या आणि पुरेशा पुराव्यांच्या आधारे मंत्रालयाने ही विनंती केली आहे. कथित हवाला व्यवहारांशी संबंधित मनी लॉड्रिंग प्रकरणात तपास संस्था सीबीआयने २०१७ मध्ये जैन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता आणि ईडीने तपास हाती घेतला होता.

त्यांना ३० मे २०२२ रोजी अटक करण्यात आली. जवळजवळ १८ महिने तुरुंगात घालवल्यानंतर ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांना जामीन मिळाला. तेव्हापासून ते बाहेर आहेत. ईडीने त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे.

माजी मंत्री जैन यांच्यावर २०१५ ते २०१७ दरम्यान अनेक लोकांच्या नावे जंगम मालमत्ता मिळवल्याचा आरोप आहे. नंतर, ईडीने मनी लॉड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) गुन्हा दाखल केला.

जैनवर कोलकातास्थित एंट्री ऑपरेटर्सना रोख रक्कम हस्तांतरित करण्याच्या बदल्यात हवाला चॅनेलद्वारे शेल कंपन्यांकडून ४.८१ कोटी रुपये घेतल्याचा आरोप आहे.

जानेवारी २०२५ मध्ये, ईडीने सत्येंद्र जैन यांच्याविरुद्ध पुरेसे पुरावे सापडल्यामुळे त्यांच्यावर आरोप निश्चित करण्याची विनंती न्यायालयाला केली. सत्येंद्र जैन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बनावट कंपन्यांद्वारे बेकायदेशीर पैसा लपवून तो मालमत्तांमध्ये गुंतवण्याचा कट रचला होता, असे ईडीचे म्हणणे आहे.

# कोंढवा येथे छेडछाडीला कंटाळून तरुणीचा आत्महत्येचा प्रयत्न



**पुणे :** कोंढवा परिसरात एका २० वर्षीय तरुणीने छेडछाडीला कंटाळून उंदीर मारण्याची वडी खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पीडित तरुणीला सातत्याने त्रास देणाऱ्या आरोपी तरुणाविरुद्ध कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तरुण पीडितेचा पाठलाग करून तिला वारंवार फोन करत होता. तो तिला लग्नासाठी दबाव टाकत असून, नकार दिल्यास तिला रस्त्यावरून उचलून नेण्याची आणि तिचे एडिट केलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी देत होता. त्याचबरोबर तो तिच्याशी अश्लील भाषेत संवाद साधत असे. या सर्व त्रासाला कंटाळून तरुणीने आत्महत्येचा प्रयत्न केला.

घटनेची माहिती मिळताच कोंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि पीडित तरुणीचा जबाब नोंदवला. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन थोरात यांच्या नेतृत्वाखाली पुढील तपास सुरू आहे.

याच दरम्यान, चंदननगर परिसरात एका १३ वर्षीय विद्यार्थिनीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न झाला. २१ वर्षीय आरोपीने शाळेत जाणाऱ्या मुलीचा मोटारसायकलवरून पाठलाग करून तिला अडवले आणि मोबाईल नंबर व इन्स्टाग्राम आयडीची मागणी केली. विरोध केल्यावर त्याने मोटारसायकल तिच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. पीडितेच्या भावाने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्याला मारहाण केली. या प्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पूजा खेडकरच्या अटकेवरील स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने वाढवली

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (१४ फेब्रुवारी) माजी प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर यांच्या अटकेवरील स्थगिती १७ मार्चपर्यंत वाढवली. १५ जानेवारी रोजी झालेल्या शेवटच्या सुनावणीत न्यायालयाने अटकेला स्थगिती दिली होती.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने खेडकर यांना तपासात सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ मार्च रोजी होईल.

खेडकर यांच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा यांनी न्यायालयाला सांगितले की, खेडकर तपासात सहकार्य करत आहेत. परंतु पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी बोलावले नाही.

त्याच वेळी, पूजा यांच्या अटकपूर्व जामीन अर्जाला नकार देण्याच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उत्तर दाखल करण्यासाठी न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिलेला वेळही वाढवला आहे.

पूजा यांच्यावर संघ लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी इतर मागासवर्गीय (OBC) आणि अपंगत्व कोट्याअंतर्गत आरक्षण मिळविण्यासाठी फसवणूक केल्याचा आरोप आहे.

गेल्या सुनावणीत, सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाचा २३ डिसेंबर २०२४ चा आदेश रद्द केला होता. पूजा यांची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा म्हणाले होते की, उच्च न्यायालयाच्या आदेशात काही टिप्पण्या आहेत. ज्या खटला सुरू झाल्यावर पूजा यांच्याविरुद्ध वापरल्या जाऊ शकतात. यावर खंडपीठाने यूपीएससी आणि दिल्ली सरकारला नोटीस बजावली होती.

पूजाचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळताना दिल्ली उच्च न्यायालयाने कडक टिप्पणी केली होती. न्यायालयाने म्हटले होते की, ही केवळ एका संवैधानिक संस्थेचीच नव्हे, तर समाजाची आणि संपूर्ण देशाची फसवणूक आहे. पूजाचे पालक उच्च पदांवर होते, हे उच्च न्यायालयाने मान्य केले होते. यावरून प्रभावशाली लोकांशी संगनमत असण्याची शक्यता दिसून येते.

यापूर्वी, १ ऑगस्ट २०२४ रोजी दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टाने पूजाचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. यानंतर पूजा दिल्ली उच्च न्यायालयात पोहोचली.

पूजा पुण्यात प्रशिक्षणार्थी अधिकारी म्हणून प्रशिक्षण घेत होती. या काळात त्यांच्यावर सुविधांची मागणी केल्याचा आरोप होता. एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या चेंबरवर कब्जा केल्याची तक्रारही समोर आली. त्यांनी त्यांच्या वैयक्तिक ऑडी कारमध्ये लाल दिवा आणि 'महाराष्ट्र सरकार' अशी प्लेट लावली.

पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी पूजाविरुद्ध तक्रार दाखल केली होती, त्यानंतर तिची वाशिम येथे बदली करण्यात आली. यानंतर, जेव्हा या प्रकरणाची चौकशी करण्यात आली तेव्हा असे आढळून आले की त्यांनी यूपीएससीमध्ये निवड होण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर केला होता. तपास जसजसा पुढे सरकत गेला, तसतसे अनेक धक्कादायक खुलासे समोर आले.

•अपंगत्व प्रमाणपत्रात पूजा खेडकर यांचा पत्ता 'प्लॉट क्रमांक ५३, देहू आळंदी रोड, तळवडे, पिंपरी चिंचवड, पुणे' असा लिहिलेला होता. या पत्त्यावर घर नसले तरी, थर्मोव्हर्टा इंजिनिअरिंग कंपनी नावाचा एक कारखाना आहे. पूजाची जप्त केलेली ऑडी याच कंपनीच्या नावावर नोंदणीकृत होती.

•सरकारी नियमांनुसार, अपंगत्व प्रमाणपत्र बनवण्यासाठी आधार कार्ड अनिवार्य आहे, परंतु पूजाच्या प्रमाणपत्रात रेशन कार्ड वापरण्यात आले.

•पूजाची अपंग कोट्यातून यूपीएससीमध्ये निवड झाली, तेव्हा पूजाची अनेक अपंगत्व प्रमाणपत्रे समोर आली. पूजाने २०१८ आणि २०२१ मध्ये अहमदनगर जिल्हा सिव्हिल हॉस्पिटलमधून जारी केलेले दोन वेगवेगळे प्रमाणपत्रे यूपीएससीला सादर केली होती.

•पूजाने तिच्या अपंगत्वाच्या प्रमाणपत्राची पुष्टी करण्यासाठी दिल्लीत वैद्यकीय तपासणीसाठी अनेक वेळा अपॉइंटमेंट घेतली, परंतु नंतर तिने एका खाजगी रुग्णालयाचा अहवाल यूपीएससीला सादर केला.

•यशवंत राव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटलने स्पष्ट केले की, पूजाचे लोकोमीटर प्रमाणपत्र बनवण्यात कोणतीही चूक झाली नाही. प्रमाणपत्रात पूजाला ७% हालचाल अक्षमता असल्याचे दाखवण्यात आले. हे रुग्णालय पिंपरी चिंचवड महानगरपालिकेद्वारे चालवले जाते.

•पूजाने यूपीएससीला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात दावा केला होता की, ती मानसिकदृष्ट्या आजारी आहे आणि तिला दिसण्यास त्रास होतो. वैद्यकीय चाचणी देणे अनिवार्य असतानाही पूजाने ६ वेळा वैद्यकीय चाचणी देण्यास नकार दिला होता.

•अनेक माध्यमांच्या वृत्तानुसार, पूजाची पहिली वैद्यकीय चाचणी एप्रिल २०२२ मध्ये दिल्ली एम्समध्ये होणार होती. ती कोविड पॉझिटिव्ह असल्याचे कारण देत त्यांनी सहभागी होण्यास नकार दिला होता.

पूजावर तिच्या पालकांच्या वैवाहिक स्थितीबद्दल माहिती लपवून ओबीसी नॉन-क्रीमी लेयर कोट्याचा फायदा घेतल्याचा आरोपही आहे. पूजाचे वडील दिलीप खेडकर हे निवृत्त आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी निवडणूकही लढवली.

निवडणूक प्रतिज्ञापत्रात त्यांनी त्यांची मालमत्ता ४० कोटी रुपये असल्याचे जाहीर केले होते, तर यूपीएससीला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात पूजा यांनी कुटुंबाची मालमत्ता ८ लाख रुपयांपेक्षा कमी असल्याचे जाहीर केले होते.

पूजाचा एक व्हिडिओही व्हायरल झाला होता, ज्यामध्ये ती तिच्या पालकांच्या घटस्फोटाचा दावा करत होती. पूजाने दावा केला की तिचे वडील तिच्यासोबत राहत नसल्यामुळे ती ओबीसी नॉन-क्रीमी लेयर श्रेणीत येते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ फेब्रुवारी २०२५


## डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात संस्कृत संभाषण शिबिर संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (डॉ. प्रतिभा धोंडकर) :** डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयातील संस्कृत विभागद्वारा दि. ३ फेब्रुवारी २०२५ ते दि. १३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत रोज सायंकाळी ६.३० ते ७.३० वाजता प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षांच्या विद्यार्थिनींसाठी गुगल मीट या ऑनलाईन माध्यमातून संस्कृत संभाषण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी ऑनलाईन माध्यमातून शुभेच्छा देऊन शिबिराचे उद्घाटन केले. तसेचसंस्कृत भाषा आणि भारतीय संस्कृती यांचे असलेले घट्ट नाते व आधुनिक काळात संस्कृत भाषेचे महत्त्व आणि परदेशामध्ये होणाऱ्या संस्कृत भाषेतील संशोधनाविषयी विद्यार्थ्यांना प्राचार्यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून माहिती दिली.

संस्कृत विभाग प्रमुख प्रा.डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी या शिबिराच्या आयोजनाची भूमिका प्रास्ताविकातून व्यक्त केली. या शिबिरामध्ये ५० विद्यार्थिनींनी नोंदणी केली होती. दहा दिवस प्रा. विशाखा जोशी यांनी अध्यापनाचे कार्य केले तर तांत्रिक सहाय्य प्रा.डॉ. प्रतिभा धोंडकर यांनी केले.

दि.१३ फेब्रुवारी रोजी या शिबिराचा समारोप यशस्वीरित्या संपन्न झाला. समारोपाच्या प्रसंगी संस्कृत विभाग प्रमुख प्रा. डॉ.मीनल श्रीगिरीवार यांनी संस्कृत अध्ययनात संस्कृत संभाषणाचे महत्त्व सांगून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कु. भाग्यश्री नंद, वैष्णवी ठोंबरे, कु. धनश्री पिंपळे, कु. साफल्या धानोरकर, कु. वैभवी त्रिभुवन, कु. प्राजक्ता सरोने, कु. खुशी बताडे, कु. ज्योत्स्ना नरवडे या विद्यार्थिनींनी ऑनलाईन दश दिवसीय संस्कृत संभाषण शिबिरात अवगत केलेल्या संस्कृत संभाषण कौशल्याचे सादरीकरण केले. तसेच आपले मनोगत सादर केले.

## श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयात वार्षिक कला-क्रीडा महोत्सव-२०२५ चे उद्घाटन



**जालना :** महाविद्यालयीन जीवन हे खऱ्या अर्थाने संपूर्ण आयुष्याच्या उभारणीचा काळ असतो. याच काळात आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जात असतात. विद्यार्थिनींच्या कला गुणांना पंख देणारा कला-क्रीडा महोत्सव आहे, असे प्रतिपादन बजाज फिनसर्वचे प्रशिक्षक श्री. शैलेश देशपांडे यांनी केले.येथील श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थिनींसाठी वार्षिक कला-क्रीडा महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून बजाज फिनसर्वचे प्रशिक्षक श्री. शैलेश देशपांडे हे होते तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी तळेकर हे होते. यावेळी मंचावर आयक्यूएससी समन्वयक डॉ. वासुदेव उगले व सांस्कृतिक समिती सदस्य प्रा. पार्वती देशमुख यांची विशेष उपस्थिती होती.पुढे बोलताना श्री. देशपांडे म्हणाले की, वार्षिक कला-क्रीडा महोत्सव-२०२५ हा खऱ्या अर्थाने विद्यार्थिनीच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

या उपक्रमाने विद्यार्थिनींना कलागुणांच्या सादरीकरणासाठी स्वतंत्र मंच मिळेल. अशा महोत्सवातूनच नवनवीन कलावंत घडत असतात. म्हणून अशा महोत्सवाचे आयोजन करणे महत्त्वाचे आहे.आजच्या मोबाईल आणि समाज माध्यमांच्या काळामध्ये मोबाईल केंद्री जग झालेले असताना आपलं महाविद्यालय विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी अशा प्रकारचा महोत्सव आयोजित करत आहे. ही खरंच कौतुकास्पद बाब आहे, असेही ते यावेळी म्हणाले.अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना डॉ. तळेकर म्हणाले की, महाविद्यालयीन जीवन आयुष्याचा पाया असतो. खरे-खोटे ओळखण्याची क्षमता या काळात विद्यार्थिनींमध्ये असते. म्हणून विद्यार्थिनींनी वर्ग अध्यापनाबरोबरच कलागुणांमध्येही तेवढ्याच उत्स्फूर्तपणे सहभागी झालं पाहिजे.कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर शुभेच्छा मनोगत व्यक्त करताना डॉ.उगले म्हणाले की, वार्षिक कला क्रीडा महोत्सव-२०२५ हा विद्यार्थिनीच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक उपक्रम आहे. यामध्ये महाविद्यालयाच्या वतीने मशाल रॅली व उद्घाटन सत्रानंतर सौंदर्य स्पर्धा विभागात वेशभूषा स्पर्धा, केशभूषा स्पर्धा, नेल आर्ट स्पर्धा, फुल मॅचिंग स्पर्धा, सौंदर्यवती स्पर्धा तर ललित स्पर्धा विभागात कोलाज स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, व्यंगचित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, स्पॉट फोटोग्राफी अशा स्पर्धांचे आयोजन आज करण्यात आलेले आहे. हा महोत्सव १३ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२५ दरम्यान होणार आहे.

या महोत्सवामध्ये नाट्य स्पर्धा, वाङ्मयीन स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, हास्य स्पर्धा व १८ फेब्रुवारी रोजी आनंदनगरी आणि २० फेब्रुवारीला पारितोषिक वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्पर्धा समन्वयक प्रा.पार्वती देशमुख यांनी केले तर डॉ. जयश्री वाडेकर यांनी उपस्थितांचे आभार प्रकट केले. यावेळी जोशपूर्ण वातावरणात डॉ.जितेंद्र अहिरराव, डॉ.सुधाकर वाघ, डॉ.केशव सोळंके, डॉ.स्वाती महाजन, प्रा. पूजा अरोरा, प्रा.राहुल अंभोरे, प्रा.दीक्षा आनंद, प्रा.अंजु कुलकर्णी, प्रा.प्रवीण घुगे, प्रा. शीला कवडे, प्रा. सचिन शेवातेकर,डॉ.अंकित गायकवाड, प्रा.पापाजी चव्हाण, श्री.जे.बी शेख, श्री.ईश्वर शिंदे, श्री.गणपत वैद्य यांच्यासह विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## गंगाधरही शक्तिमान है, सुषमा अंधारे यांची धस-मुंडे भेटीवर टीका



**बीड :** भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यात भेट झाली. या भेटीवरून राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील आमच्या तिघांमध्ये साडे चार तास भेट झाल्याचे सांगितले आहे. यावरून आता ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी सुरेश धस यांच्यावर टीका केली आहे. सुरेश धस असे करूच कसे शकतात? असा सवालच सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, सुरेश धस बीडच्या जनतेचा विश्वास गमावत आहेत. मला संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांचे वाईट वाटते ज्यांनी सुरेश धस यांच्यावर एवढा विश्वास टाकला. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेऊन बीडच्या जनतेचा विश्वास गमावला. सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणामध्ये कधी ते पोलिसांना माफ करा म्हणतात, कधी ते धनंजय मुंडेंच्या घरी जाऊन भेटतात. ही संभ्रमावस्था ते का निर्माण करतात? ते फक्त स्वतःचा विश्वास गमवत नाहीत तर ते देवेंद्र फडणवीस यांची विश्वासार्हता सुद्धा गमवत आहेत.

पुढे सुषमा अंधारे म्हणाल्या, सुरेश धस यांनी जो लढा उभा केला होता तो फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जिथे राष्ट्रवादी आहे तिथे भाजपचा शिरकाव करण्यासाठीच होता. धस यांची मराठा नेता म्हणून एस्टॅब्लिश करणे आणि देवेंद्र फडणवीस यांची इमेज बाहुबली प्रस्तावित करणे एवढेच काम त्यांना करायचे होते. ते काम फत्ते झाल्यानंतर आता एकमेकांच्या गळ्यात गळे घातल्यानंतर काय फरक पडतो असे त्यांना वाटत असेल.

तसेच राज्यातील १८ पगड जातीने सुरेश धस यांच्यावर विश्वास दाखवला, तो विश्वास त्यांनी मातीमोल ठरवला. त्यामुळेच गंगाधरही शक्तिमान है, असे आम्हाला खेदाने म्हणावे लागत आहे, असेही सुषमा अंधारे म्हणाल्या आहेत. दरम्यान, सुरेश धस यांनी ही भेट तब्येतीची विचारपूस करण्यासाठी घेतली असल्याचे स्पष्ट केले आहे.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ फेब्रुवारी २०२५

# मानवतावादी, क्रांतिकारी महापुरुष संत सेवालाल महाराज



क्रांतिकारी महापुरुष सद्गुरु सेवालाल महराज यांची जयंती १५ फेब्रुवारी रोजी दरवर्षी शासकीय स्तरावर साजरी होते. संत सेवालाल महाराज हे भारतीय विचारवंत व समाजसुधारक होते. शूरवीर लढवय्या 'गोर राजवंशी बंजारा' समाजात क्रांतिकारी सतगुरू (सतगरू) महाराजांचा जन्म झाला. संत सेवालाल महाराज गोर बंजारा जरी असले तरी त्यांचे विचार कुठल्या जाती धर्मासाठी नसून; समस्त मानव कल्याणाच्या उद्धारासाठी प्रेरणा देणारे आहेत. सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील गुट्टी तालुक्यातील गोलाल डोडी गावात झाला. आता ते गाव 'सेवागड' या नावाने ओळखले जाते.

संत सेवालाल महाराज नेहमी पांढरे वस्त्र परिधान करायचे. पांढरा रंग शांतीचा प्रतीक आहे. पांढरा रंग सर्व रंगांना समाविष्ट करून घेणारा रंग आहे.त्यामुळे भेदभावाचा प्रश्नच येत नाही.अलीकडे जातीपातीचे राजकारण करणाऱ्या लोकांनी सेवालाल महाराजांच्या विचाराची कास धरावी.ती सुद्धा भेदभावाला थारा देत नव्हते.याउलट रसदची ने आण करताना रस्त्यात कोणी अनोळखी पर जातीय व्यक्ती जर भेटला, तर ते स्वतः त्या लोकांना आत्मनिर्भर करण्यासाठी व्यापार करा अशी प्रेरणा देत असत. व्यापार किंवा व्यवसाय करणारा माणूस सर्वांच्या सहवासात राहतो. आणि एक मानवतावादी, नैतिक मूल्यांची, आपलेपणाची विचारसरणी त्यांच्यात निर्माण होते. त्यामुळे सर्व मानव समाजाला समान वागणूक मिळावी आणि समस्त मानवाला एकजुटीने राहता यावे. यासाठी बंजारा समाज हजारो शेकडो वर्षापासून गोपालन आणि बैलांच्या पाठीवर मसाल्याच्या पदार्थाचे निर्यात करत होता.

संत सेवालाल महाराज यांचे पूर्ण नाव: सेवा भिमानायक राठोड (रामावत)जन्म : १५ फेब्रुवारी १७३९,रामजी नायक तांडा, बावन बराड़, गुत्तिबल्लारी, सध्या सेवागढ नावाने ओळखले जाते , गुत्ति मंडल, अनंतपुर जिला, आंध्र प्रदेशमृत्यू: ४ डिसेंबर १८०६ रुईगड, यवतमाळ, महाराष्ट्र.त्यांचे वडील भिमानायक, आणि आई धरमळी माता होती. आई वडिलांकडून त्यांना निस्वार्थी, आत्मनिर्भर, स्वाभिमानी, सामाजिक बदलाचे संस्कार मिळाले.संत सेवालाल महाराज हे बंजारा (गौर) राज घराण्याचे भारतीय सामाजिक-धार्मिक क्षेत्रातील एक सुधारक होते. बाबा लखीशाह बंजारा, क्रांतिकारी संत गोविंद गुरू बंजारा यांच्यासह शुरवीर गोरराजवंशी बंजारा समुदाय संत सेवालाल महाराजांना आपले आध्यात्मिक गुरू म्हणून मानतात. ते विरक्त आणि निस्वार्थी स्वभावाचे होते.लोकांमध्ये मत परिवर्तन करण्यासाठी आपले आयुष्य त्यांनी ब्रह्मचारी राहून झिजवले.त्यांची पशुपक्षी जंगल पर्यावरणाशी अगाढ मैत्री होती. त्यामुळे त्यांची शिकवणही अमूल्य अशीच आहे. ते म्हणायचे, "जंगल आणि पर्यावरणाचे रक्षण करा", "कोणासोबत भेदभाव करू नका.""कष्ट करून स्वाभिमानी आणि सन्मानाने आयुष्य जगा"."इतरांशी वाईट बोलू नका आणि इतरांना ठेच पोहोचवू नका.""मुलगी ही जिवंत देवी आहे, त्यामुळे सदैव स्त्रियांचा सन्मान करा.""काळजी करू नका आणि आलेल्या संकटाला निर्भयपणे तोंड दया." "धैर्यवान आणि आत्मविश्वासू जीवन जगा.""पाणी जतन करा आणि तहानलेल्यांना पाणी द्या. येणारा काळ हा अवघड आहे.""वडीलधारी माणसांचा आदर करा.""जंगलाला कधीही सोडू नका आणि जंगल नष्ट करू नका, जर आपण जंगल नष्ट केले तर आपण स्वतःला नष्ट करीत आहोत.""माणुसकीवर प्रेम करा,अंधश्रद्धा वर विश्वास ठेवू नका.","आपल्या कुटुंबासोबत समाजातील बंधुतेचा कधी भंग होऊ देऊ नका." असे थोर विचार मांडणारे क्रांतिकारी पुरुष संत सेवालाल महाराज होऊन गेले. त्यांनी अंधश्रद्धेत सापडलेल्या भक्तांना त्यातून मार्ग काढण्यासाठी आजीवन मार्गदाता म्हणून भूमिका बजावली. "कोणीही लहान मोठे नाही. सर्व पशु-प्राणी मानव समान आहेत."सेवालाल महाराज यांनी त्यांचे वचन आणि उपदेश हे गोर बोलीत (बंजारा भाषेत) दिले आहे. ते पुढीलप्रमाणे "रपीया कटोरो पांळी वक जाय।" भावार्थ: एका रूपयाला एक वाटी पाणी विकेल। आज वीस रुपयात बॉटल बंद एक लिटर पाणी मिळते. "रपियार ढेर चंळा वक जाया""कसाईन गावढी मत वेचो।" पशुपक्षी पर प्रेम करो.भावार्थ: कसायाला किंवा खाटकाला गाय विकू नका। पशु प्राण्यांवर प्रेम करा.जिवते धंळीर बाईन (बायको) घरेम मत लावजो। भावार्थ: जिवंत नवरा असणाऱ्या स्त्रीला आपली बायको म्हणून घरात आणू नका।चोरी लबाडीरो धन घरेम मत लावजो। भावार्थ: चोरी करून, खोट बोलून, कोणतेही धन घरात आणू नका।केरी निंदा, चाडी, चूगली मत करजो। भावार्थ: कोणाची निंदा, चाडी चूगली किंवा लावा लावी करू नका।"मलके रो दख आजाय, डॉक्टरेन ओर इलाज मळ कोण, घर घर जायेरो बंद वेजाय। भावार्थ: जगात मोठे आजार येतील एक वेळ अशी येईल की डॉक्टरला सुद्धा इलाज भेटणार नाही एकमेकांच्या घरी जायचं बंद होऊन जाईल. उदा. Covid-१९ (कोराना)ला आलेला कोरोना आजार. "बापेर बेटा सांमळ कोणी।" भावार्थ: बापाचा मुलगा ऐकणार नाही."कोई केणी भजो मत, कोई केनी पुजो मत, भजे पुजे म वेळ मत घालो. आपले मनगटेपर विश्वास रकाडो" भावार्थ: कोणी कोणाला भजू नका, पुजू नका भजण्या पुजण्यात वेळ घालवू नका. आपल्या कर्म आणि मनगटांवर विश्वास ठेवा."जांळजो, छांळजो पछच माणजो।" भावार्थ: कोणतीही गोष्ट जाणून घ्या किंवा त्याची माहिती करून घ्या, त्यावर विचार मंथन करा आणि नंतरच ती गोष्ट स्वीकारा।ये जो वातेर पत रकाडीय वोन पाने आड पान तारलींव। – भावार्थ: ह्या गोष्टीचा जो कोनी आदर करेल, आचरणात आणेल स्वीकार करेल मी त्यांचा समर्थन करेल. पाना आड पान तारेल।या व्यतिरिक्त धर्माच्या रक्षणासाठी त्यांनी निजामाविरूद्ध लढा सुद्धा उभारला होता. समाजातील अनिष्ठ रूढी व शोषणाविरुद्ध त्यांनी आपल्या वाणीतून प्रहार चढवून सामाजिक सुधारणा व्हावी म्हणून आग्रही भूमिका घेतली. ते थोर मानवतावादी महापुरुष होते. मानवी कल्याणासाठी त्यांनी सर्वदूर मानवता, पर्यावरण रक्षण, गोरक्षणाचा संदेश दिला. अलीकडे महाराष्ट्र व तेलंगाना राज्यात संत सेवालाल महाराज यांची जयंती शासन स्तरावर साजरी केली जाते. पण काही विशिष्ट लोकच जयंती साजरी करताना दिसतात. खरंतर मनोभावे सगळ्या जाती, धर्म, पंथातील लोकांनी प्रत्येक महापुरुषांची जयंती साजरी करावी. ही मनोभावे सदिच्छा..सेवालाल महाराज जयंतीनिमित्त सर्व मानव समुदायाला हार्दिक शुभेच्छा.

**प्रा. केशरचंद राठोड**
लेखक हे भटक्या विमुक्तांचे संशोधक आहेत.

# विनायक सोनवणे मक्रणपुरच्या सरपंचपदी कायम ! पती पत्नी दोघांनाही दिलासा



**कन्नड (राहुल थेटे)** कन्नड तालुक्यातील ग्रामपंचायत मक्रणपुर येथील सरपंच विनायक सोनवणे व त्यांच्या पत्नी ग्रामपंचायत सदस्य दोघांचेही सदस्यपद कायम ठेवल्याने दिलासा मिळाला आहे.विभागीय आयुक्त दिलीप गावंडे यांच्या आदेशाने दिलासा मिळाला आहे.मक्रणपुर ग्रामपंचायतचे सरपंच विनायक नाथु सोनवणे व त्यांची पत्नी उषाबाई विनायक सोनवणे यांच्याविरुद्ध युवराज यादवराव बागुल व संतोष प्रभाकर जाधव यांनी जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या न्यायालयात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (ज-३) नुसार ग्रामपंचायत मिळकत क्र. ११७/१ व तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र.११७वर नमुना नं. ८ च्या पेक्षा जास्त क्षेत्रावर अतिक्रमण केले म्हणुन प्रकरण दाखल केले होते. तहसीलदार कन्नड व गटविकास अधिकारी व इतर कमिटी सदस्य यांनी चौकशी अहवाल दिला होता.

त्यामध्ये यापुर्वी विनायक नाथु सोनवणे यांना अपात्र ठरवले होते व त्यांची पत्नी उषाबाई विनायक सोनवणे यांचे पद कायम केले होते त्या विरोधात अप्पर विभागीय आयुक्त यांच्या न्यायालयात दोन्ही पक्षांनी अपील दाखल केल्या होत्या.त्यामध्ये दोन्ही अपील मंजुर होवुन प्रकरण चौकशीसाठी जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे आले होते. परंतु त्यामध्ये फेरचौकशी अहवाल मागवुन न घेता पुर्वीच्या चौकशी अहवाला आधारे सरपंच विनायक सोनवणे व त्यांची पत्नी उषाबाई सोनवणे यांचे दोघांचे पद जिल्हाधिकारी यांनी रद्द केले. त्या अनुषंगाने पुन्हा सरपंच व त्यांची पत्नी यांनी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्या न्यायालयात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १६ (२) नुसार अॅड. शरद वि. भागडे पाटील यांच्यामार्फत अपील दाखल केले होते. सुनावणीअंती विभागीय आयुक्त दिलीप गावंडे यांनी दि. ०७ फेब्रुवारी रोजी दोन्ही अपिलामध्ये स्थगिती दिली तसेच तहसीलदार, गटविकास अधिकारी व उपअधिक्षक भुमी अभिलेख यांचा सुध्दा चौकशी अहवाल पुन्हा नव्याने मागवुन घेण्याचा आदेश पारित करण्यात आला तसेच सदर प्रकरणात मक्रणपुरचे सरपंच विनायक सोनवणे हे पुन्हा पदावर विराजमान झाले व त्यांची पत्नी या ग्रामपंचायत सदस्य म्हणुन सुध्दा पुन्हा पदावर विराजमान झालेल्या आहेत. गावक-यांनी स्थगिती मिळाल्यामुळे गावामध्ये फटाके फोडुन आनंदउत्सव साजरा केला.

गावविकासाला गती मिळेल हीच गावक-यांची भावना झालेली आहे. सदर प्रकरणात सरपंच विनायक सोनवणे व त्यांची पत्नी उषाबाई विनायक सोनवणे यांच्यातर्फे अॅड. इस्तीयाक पटेल व अॅड. शरद वि. भागडे पाटील यांनी कामकाज पाहिले तसेच त्यांना ऍड. अयाज शेख यांनी सहकार्य केले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ फेब्रुवारी २०२५

# महात्मा गांधी विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न






























**उमरगा (प्रतिनिधी) :** महात्मा गांधी विद्यालय, केसरजवळगा येथील इयत्ता दहावीमध्ये १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात असणाऱ्या माजी शालेय विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रविवार दि. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी महात्मा गांधी विद्यालय केसरजवळगा येथे संपन्न झाला. यावेळी १९९३-९४ च्या बॅचमधील सर्व विद्यार्थी एकत्र आले होते.

कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पुजनाने केली. तत्पूर्वी सर्व आजी माजी शिक्षकांवर रेडकार्पेटवरून पुष्पवृष्टी करीत स्टेजपर्यंत आमंत्रित करण्यात आले. स्टेजवर आल्यानंतर दिवंगत शिक्षक स्व. हेमुद्री बादोले, रतनसिंग राजपूत, जयप्रकाश आलुरकर, सूर्यभान माने, महादेव पाटील, ईस्माल शेख यांच्यासह दिवंगत विद्यार्थी मित्र शशिकिरण स्वामी, सिद्राम कुंभार, हणमंत जाधव, लिंगाजी बंदिछोडे, महादेव बनसोडे यांना श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर बनजगोळे मॅडम व त्यांच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत गीतानंतर मूळ कार्यक्रमास सुरूवात झाली. त्यानंतर उपस्थित सर्व आजी माझी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना फेटा बांधून, शॉल, श्रीफळ व गिफ्ट देऊन सत्कार करण्यात आला.

सर्वप्रथम या कार्यक्रमाचे प्रास्तविकामध्ये रामेश्वर जिरोळे यांनी सांगितले की, तब्बल ३१ वर्षापासून एकमेकांना न भेटलेल्या आपल्या मित्र/मैत्रिणी आणि आपल्या शिक्षकांना एकत्र भेटण्याची संधी प्राप्त व्हावी हाच हेतू डोळयासमोर ठेवून या कार्यक्रमाचे नियोजन केले होते आणि तो हेतू साध्य झाले आहे असे मला वाटते कारण की, आज आपल्या जिवलग मित्र /मैत्रीणी व शिक्षकांना भेटून जो आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत आहे, असे प्रतिपादन करून जुन्या आठवणीत रमताना शाळेतील गमतीजमती, शिक्षकांच्या विविध आठवणी, खाल्लेला मार, केलेला खोडकरपणा असे गमतीशिर किस्से सांगितले. त्यानंतर सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपापला अल्प परिचय दिला व काहीनी आपले मनोगत व्यक्त केले.

मनोगत व्यक्त करताना इरफान इनामदार यांनी गुरूजनांचे आदर्श व्यक्तीमत्वाचा उल्लेख करीत आपण जे काही आज जीवनात यशस्वी वाटचाल करीत आहोत ते फक्त गुरूजनांनी दिलेल्या अफाट ज्ञानाच्या शिदोरीमुळेच असे प्रतिपादन केले. जी गोष्ट डोक्यात असते ती कालंतराने विस्मरणात जाते परंतु जी गोष्ट ह्दयात जाते ती शेवटपर्यंत अजरामर राहते. म्हणून शिक्षकांचे स्थान हे माझ्या डोक्यात नसून माझ्या ह्दयात आहे अशी भावनिक साद घातली.

आपले मनोगत व्यक्त करताना वैशाली बादोले यांनी सांगितले की, आपल्या आई-वडिलानंतर आपल्या जीवनाचे खरे शिल्पकार हे शिक्षक असून त्यांचे आचार-विचार, संस्कार, निती-मूल्यांचा जीवनात अंगीकार केला तर निश्चित माणूस जीवनात यशस्वी होऊ शकतो. शिक्षक हे असे व्यक्तीमत्व आहे ज्याचे ऋण आपण कधीच फेडू शकत नाही मात्र त्यांचे आभार निश्चित मानू शकतो. तेव्हा उपस्थितांनी टाळयांचा कडकडाट करून जणू होकारच दिला.

त्यांनर २५ वर्षापासून शिक्षकी पेशेत असलेल्या विजयालक्ष्मी जिरोळे यांनी आपल्या मनोगतामध्ये शिक्षकांच्या विविध आठवणी सांगताना त्यांचे अष्ठपैलू व्यक्तीमत्त्वाचा उल्लेख करीत शिक्षकांचे आपल्या जीवनात किती महत्त्व आहे याचे सोउदाहरण देऊन सर्व उपस्थितांची मने जिंकली.

त्यानंतर उपस्थित शिक्षकांमधून श्रीमंत भुरे सर, सगट सर, श्रीशैल घोडके सर, लक्ष्मण देवकर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष गोबाडे सर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात असे म्हणाले की, जुने विद्यार्थी आणि अताच्या विद्यार्थ्यांमध्ये खुप बदल आहे. जुने विद्यार्थी शिस्तप्रिय व शिक्षकांचे आदर करणारे गुणी विद्यार्थी होते. त्यांचे कौतुक करावे तितके कमीच आहे. त्याचबरोबर मोबाईल मुळे आपण जवळ आलो असे वाटत असले तरी जो आनंद प्रत्यक्ष भेटून व बोलून मिळू शकतो तो शब्दात व्यक्त करता न येणारे आहे. त्यामुळे नुसत्या सोशलमिडीयावर ॲक्टीव्ह न राहता वेळोवेळी प्रत्यक्ष भेटत राहणे हेच महत्त्वाचे आहे. आज आपण एका घरात राहून सुद्धा खुल्या दिल्याने गप्पा मारण्याचे तंत्र विसरलो आहोत. याचे दुषपरिणाम आपल्याला लवकर दिसून येतील असेही त्यांनी सांगितले. माझा येथोचित सन्मान केल्यामुळे खरेच मी आज खुप भारावून गेलो आहे असे भावनिक साद ही त्यांनी घातली.

त्यानंतर शाळेचे कार्यरत मुख्याध्यापक डी. एस. कुलकर्णी यांचे अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कुलकर्णी सरांनी या कार्यक्रमाची प्रशंसा करीत या कार्यक्रमाचे आयोजक रामेश्वर जिरोळे, इरफान इनामदार, वैशाली बादोले, शोभा राजपूत व तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

यावेळी श्रीमंत भुरे, प्रभाकर हुलगणे, एन. व्ही. सगट, प्रमोद बादोले, जयपालसिंग राजपुत, धनंजय बनजगोळे, लक्ष्मण देवकर, योगेश कोडलंगरे, रमेश भुरे, वैजीनाथ भंडारकवडे, सिद्धु पाटील, नातराव डिगोळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शाळेच्या मैदानामध्ये एक आठवण म्हणून वृक्षारोपणही करण्यात आले.

तब्बल ३१ वर्षानी ऋणानुबंधाच्या जुन्या आठवणींना उजाळा देतानाच नव्याने तयार झालेल्या आठवणींच्या ठेवा सर्वांचा एकत्रित छायाचित्रासह आपल्या ह्दयात साठवून सोशल मिडीयाच्या माध्यमातून पुन्हा भेटण्याच्या निश्चय करून एकमेकांचा निरोप घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन विजयालक्ष्मी जिरोळे यांनी वेळोवेळी शिक्षकांच्या आठवणींना उजाळा देत आपल्या रूबाबदार वाक्यरूपाने म्हणी, शेरोशायरी यांचा वापर करीत रंगतदारपणे सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली तर वैशाली बादोले यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जालिंदर रावळे, कैलास राजपूत, विजय बिराजदार, दत्ता पवार, दयानंद घोडके, संतोष मंठाळे, चितानंद स्वामी, सूर्यकांत भूरे, रमेश रावळे, बाबू सुरवसे, मारूती क्षिरसागर आदींनी प्रयत्न केले.